11:32 358 KB/s 4G 72

पुण्य नगरी

किशोरी गटातील मुलींसाठी मार्गदर्शन

वडगावशेरी : प्रतिनिधी

यार्डी सॉफ्टवेअर व स्त्रीवाणी संस्थेच्या संयुक्त विद्यमाने किशोरी गटातील मुलींसाठी कायदेशीर मार्गदर्शन तसेच सामाजिक परिस्थितीचे भान कसे ठेवावे याबाबत विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. पथनाट्यद्वारे, सध्याची जिवंत उदाहरणं देऊन समजावून सांगण्यात आले. या कार्यक्रमात संस्थेच्या कोऑर्डिनेटर मृणाल काकडे व सोशल वर्कर रंजना खुडे यांनी मार्गदर्शन केले.

सध्याच्या काळात वाढत्या सायबर गुन्ह्यांपासून बचाव कसा करावा याबाबतही माहिती देण्यात आली. यासाठी क्विक हिल कंपनी तर्फे आलेले यशराज काकेकर यांनी किशोरी गटाला महत्त्वपूर्ण माहिती दिली.

या कार्यक्रमात सहभागी झालेल्या मुलींनी अतिशय आनंद व्यक्त केला तसेच त्यांच्याशी संबंधित काही अनुभव आणि घडलेल्या घटना देखील उघडपणे मांडल्या. वस्ती पातळीवरील युनियन लीडर अश्विनी मस्के, आशा यादव, भाग्यश्री मस्के व गंगू शिंगे यांनी ही कार्यक्रमासाठी मदत केली. संस्थेच्या संचालिका हेलन यांच्या साहाय्याने कार्यक्रम झाला.

Pune Edition
Aug 25, 2025 Page No. 04
Powered by: erelego.com